म. ग्रं. सं. ठाणें

विषय

संग्रहालय क्रमांक

लेखक स.बा. सरनाईक

सन

पुस्तकाचें नांव आठरवमे सठेर पठरवमे दयाव "मनोरंजक

हे पुस्तक,

**सखाराम बाळकृष्ण सरनाईक,**

यांजकडून तयार करवून,

पुणें पेंठ बुधवार येथें,

**भाऊ गोविंद सापकर,**

शं

'ज्ञानचक्षु' छ

तारी

नाटक

सं. ना 343

मराठी ग्रंथ संग्रहालय
सं.
ना.
ठाणे

स्थळप्रत
म. ग्रं. सं. ठाणे.

# मनोरंजक.


"आलखमे पलख, पलखमे दरयाव"

## प्रवेश १ ला.

### स्थळ - चिंचनापल्ली.

### पात्रें.

| | |
|---|---|
| सदाशिवभट्ट | गरीबब्राह्मण. |
| पार्वतीबाई | त्याचीबायको. |
| बाळ्या. | त्याचामुलगा. |
| सगुणा. | त्याचीबायको. |
| माधवराव. | बाळ्याचास्नेही. |
| रामा, विठोबा | त्याचेमित्र. |



सदाशिवभट्ट - अगोआयकिलेंसकाय ?

पार्वतीबाई - ह्मणतातरीकाय, मीरात्रंदिवस

सदा० - अगे तसें नव्हे, माझा वृद्धापकाळ झा-
ला म्हणून तूं कांहीं करावूं नको. माझें बोलणें तर ऐ-
कतजा.

पार्वतीबाई - बरें तर बोला.

सदाशि० - माझा तर वृद्धापकाळ झाला खरा त-
शांत आपल्यास परमेश्वरानें एकुलता एक मुलगा
बाळ्या दिला आहे. त्याच्या कडे पाहिलें ह्मणजे
समाधान होतें.

पार्वतीबाई - समाधानाचें स्थान च आहे. अहो-
तुम्हाला काय होतें. बाळ्याचें ओझें मीं नऊ मास वा-
हिलें आहे, म्हणून च माझा कायतो जीव प्राण; आ-
णि आपण लागले म्हणावयाला, माझा बाळा, मा
झा बाळा.

सदाशिव - ( आपली मान हालवून ) अगो तसें न
व्हे परतें आयकलेसका, आपल्या घरीं रखाण्ण्यास

कसास कांहीं कमी का आहे? धान्याऱ्याठिक्या-मात्र नाहींत, उंदीर घुशींचा मात्र उपद्रव. आपल्या बाळ्याची बायको सगुणा किती चांगली सुलगी आहे, बोलणें, चालणें, मर्यादेनें उभें राहणें, सांगितलेलें काम चुणकशीकरणें, असें आहे तेणेंकरून माझ्या मनाला समाधानाची जागा नेवटी आहे.

**पार्वतीबाई**– ( आपल्यामान मोठ्याइशो कानें वळ वून ) पुरेपुरे. बोलावें नशीकिती? नेहमीं नेहमीं म्हणायाचें कीं, माझा बाळ्या चांगला, माझी सगुणा चांगली, लेकसून तुम्हांस आहे आणि दुसऱ्यास काहीं नाहींत? असें बोलत जाऊं नका, मला नाहीं होरवपानयानें, सांगून ठेवितें नाहींतर, आतां मी स्वयंपाक घरांत जाऊन नया-फकिरीनें, दहा घटका दिवस आला, तुह्माला का

य होतें ?

**सदाशिव०** — अगे स्वयंपाक कर अगोदर, तोबा ळ्यानदीवर स्नान करावयास गांवांत त्यामुलांब- रोबर गेला आहे. तो आल्यावर मग मात्र गडब डकरील.

**पार्वती०** — आतां आपण ओसरीवर बसून- हीतुझ्याची भाजीनिवडून द्या. मीआंग धुण्या- स जातें.

( असें दोघे बोलत आहेत तोंरामाआणिवि ठोबायेतात )

**रामा—** कायरे विठोबा. आपण सर्व नदीवर- पोहोण्या करितां गेलों असें असतां त्यासधल्या भोंवऱ्यांत आला बाळ्या बुडाला. पुष्कळ धां वाधांव केली पण कांहीं वझालें नाहीं. आपण तरी काय करातं ? अगोदर त्याच्या बापासजा-

ऊन सांभावें. म्हणजे आपल्या कडे त्याचा दोष नाहीं.

विठोबा– रामा, तूं जोखेन केला आहेस तोच-तरा. पण काय बाबाकडे जावयाचें आहे तेव्हां-आपण रडत गेलें पाहिजे.

रामा– घटिकाभर गेलें आपलें रडत त्यांत काय खर्च होणार?

( असें म्हणून दोघे जण रडत बाबाकडे येतात )

सदाशि०– ( रामा, विठोबा रडत आले हें पाहून ) अरे हें काय? तुम्हाला कोणी मारिलें काय?

रामा– नाहीं बाबा, अँ अँ अँ ( असें म्हणून मो ठ्यानें हंबरडा फोडितो. )

पार्वती०– ( त्याच्याजवळ येऊन ) अरे मुला असें काय बरें करितोस? बाळ्या बाहेरून आ-

त्याह्मणजे तुला दशमी याविशीं देईन वरेंर-
डुंनको.

विठोबा.- ( मोठ्याने ओरडून ) काकूआवांक
शाचा बाळ्या आणि कशा च्या बुगड्या, बाळ्या-
पण वाळ्या, वाहवारेबाळ्या ( असेंह्मणून मो
ठ्यानें रडतों. ) ॐ ॐ ॐ;

सदाशिव.- ( घाबऱ्या घाबऱ्या ) अरेरामा,
आहे तरी काय ? एकदांचें मला कळूंदे. उगीच-
जीव घेऊं नकोस.

रामा.- बाबा, सकाळीं मी. विठोबा, आणिबा-
ळ्या असे संगमावर पोहावयास गेलों तेथें पोह-
तां पोहतां भोंवऱ्यांत सांपडून बाळ्या बुडाला.
मग आह्मी लागलीच, बाबा, रडत तुमच्याकडे
आलों.

सदाशिव.- ( मोठ्यानें हंबरडा फोडून )

बाळ्या कां परे मला दुःखांचे पर्वत दाखविलेस ?
आतां मला वृद्ध पणीं दुसरा का बाळ्या होण्याची
आशा आहे ? माझे बैल कोंकणांत गेले - हातां,
पायांत, कंबरेंत, शक्ति नाहीं, आतां करावें तरी
काय ? ( असें म्हणून आपला ऊर बडवून घे-
तो:) ओयरे - बाळ्या -

अंजनीगीत.

माझ्या बाळा येई आतां ॥ कोठें गेला सांग-
तूं तातां ॥ आठवूं तरी मी तुझी गाथा ॥ जन्मा
पासूनी ॥ १ ॥ तुजवरि आमुचे पंच प्राण ॥ तूं-
चि कुळींचा कुळनिधान ॥ आतां येऊन करिल
निदान ॥ कवण बा आमुचें ॥ २ ॥ तुजविण-
मजला नाहीं कोणी ॥ जैसें मत्स्याला गी पाणी
॥ विपरित देवाची ही करणी ॥ कां गा रडविलें ॥
३ ॥ निपुत्रिकाचें तोंड न बघती ॥ असा सि-

बापाजाहलीनीगनी॥ वृद्धउभयतांव्यर्थवि जगती॥ कुरलोकेविंआता॥ ४॥

( असें ह्मणून जमिनीवर गडबडां लोळतो. )

पार्वतीबाई - निठावा, माझ्याबाळ्यावर असाका प्रसंग आला? अरे, तुह्मी दोघे असतां माझ्याबाळ्यालाकसा रे मरूं दिला? तुह्मां दोघांतून एकानें नशि मरून जावयाचें होतें. हायरे, आतां करावें नशी काय? ( सदाशीवभटजीकडे पाहून. ) अहो मा-झाबाळ्या कुठें गेला, याबाळ्याकरितां पिंपळाचे पार होंिजविले, माझ्यालारचोल्यानशीकिती झाल्या? व्रतें नशीकिती केलीं? वटसावित्री म्हणूं नका, गजगौरी म्हणूं नका, ऋषीपंचमी म्हणूं नका, संक्रांतीचा वोवसा म्हणूं नका, रथसप्तमी ह्म णूं नका, सगळें करून करून मागलें आणि देव धर्म लागलें.

गोड मी वदलें ॥ चाल. ॥ आतां आठनि कोठें पाहूं ॥ कसें दुःखाला कासाहूं ॥ जगिं निपुत्रीक केराहूं ॥ नाहिं शांति मना कष्टचि बहुविध-झाले ॥ दैवउलटुनी मजवरि पडलें ॥ आतां-काय करूं बालक आइंगेलें ॥ दैवउलटुनी मजवरि पडलें ॥ १ ॥

बाळ्या;—आतां तुला कोठें रे पाहूं ? हीपहा तुझी-बायको सोन्यासारखी मोट्या झोकानें उभी राहिली आणि तुझें असें झालें; गर्भाधान जाहल्यास सहा महिने स्थळं जाहले नाहींत तोंच या मुलीवर हा प्रसंग! (स्नेसपाहून.) मुली आतां रडून नरी काय व्हावयाचें आहे? जें आपल्या कपाळीं लि-हिलें तें झालें! बाळ्या;(असें ह्मणून मोठ्यानें रडून आपलें डोसकें हापटून घेतें.)

सगुणा;—(आपल्या कपाळास हात लावून ह्म-

रामा:- हें म्हणूं नको, तें म्हणूं नको असें म्हणतां मग म्हणावें तरी काय? तुम्हीच सांगा काकू.

पार्वतीबाई:- ( मोठ्यानें ऊर बडवून ) अरे बाबा, बाळ्याकरितां सारें व्रत केलीं ( असें म्हणून मोठ्यानें हंबरडा फोडिते. )

## पद.

( अजनें तो हा अक्रूर श्रीकृष्णाला सरवे का काळ कोठुन आला याचा. )

अतां काय करूं बाळक माझें गेलें ॥ देव उलटुनी मजवरि पडले ॥ धृ० ॥ नउमास पहा, उदरामधिं सांठविलें ॥ तें सर्व गूण आठवलें ॥ दुखणीं झालीं बहू औषध पाणी दिधलें ॥ ज्योतिषी पाहुनी दमलें ॥ जानाई जोखाई सटवाई देव पुजिले ॥ त्यांचें नवस सर्व केले ॥ बाळसं तो पाकापड जरी नेमीं दिधलें ॥ सकळांसि

णतें- अहोसासूबाई, कसाहोमाझा घातझाला? माझ्या मंगळसूत्रावर कशीहोधाडपडली? आतांजगांतसुखनरी कसें दाखवावें? पहायावैधव्यानें येऊन कसेंगांठलें?

## पद.

( चाल गुलफामसुझेहैं प्यारा॥ मुझेछोडचला बनजारा. )

प्राणनाथ त्यजुनिआजगेले॥ ममसौख्याचेजेझेले॥ धृ०॥ कोठेंपाहूंआजमीत्यालाकसादेवेंघाननिकेला॥सौभाग्यसिंधुनाठेला॥ बांधवक्रहरुनिकेनेला॥ चाल०॥ दुःखानेंगरळमीप्यालें॥ ममसौख्याचेंजेझेले॥ प्राणनाथ०॥ १॥

( असें ह्मणून मोठ्यानें दीर्घ हंबरडा फोडिते. )

इतक्यांत माधवराव ( बाळ्याचा स्नेही ) येतो.

माधवराव — ( असा कोल्हाळ पाहून घाबरेपणानें ह्मणतो. ) अहो बाबा, आहे तरी काय? असा आकांत तरी कशाकरितां? काय वर्तमान तरी सांगा पाहूं.

सदाशिवभट्ट — अहो माधवराव, सर्वस्वी माझें घर बुडालें. बाळ्या नदींत वाहून गेला, आतां काय करावें? ( असें ह्मणून पार्वतीबाई सह रडतो. )

माधवराव — ( आपल्याशीं ) बाळ्या गेला तर जाईना का बापडा पण माझे चार लाल ठेविले ते मात्र गेले; आतां करावें तरी काय? ( उघड ) अहो बाबा असा आकांत कांबरें करितां, जरी बाळ्या पाण्यांत बुडाला असेल तरी कोठें कडेला लागला यांत कांहीं संशय नाहीं.

सदाशि० — असें जर आहे तर तुह्मीच जाऊन कोठें तरी शोध त्याचा करा ह्मणजे झालें.

नूं भेटवी आज ॥ येवढें जाऊनि करितूं कां-
ज ॥ रुसी रुसी माझी लाज ॥ दुःखित आज
पै माझी ॥ माधवा० ॥ २ ॥ ॥ ॐ ॥

माधवराव- बाबा, कांहीं काळजी करूं नका.

दिंडी.

स्वयें जाऊनि महिमाजि शोधसारा ॥ पहा-
करितों न च अळस कष्ट सारा ॥ देईल मज-
ला जें हरीपदीं थारा ॥ तरि च येईल यश सम
रतो वदे सारा ॥ १ ॥

पार्वतीबाई- माझ्या लेंकराला घेऊन या बरें.
धांवा हो धांवा.

पद.

( चाल- पाहिन केव्हां सिंहासनि माझा राम-
राजाराम कधीं सीताराम कधीं )

पाहिन कधिं मी बाळक नयनीं सन्मुख तुम्हि

माधवराव.- असें जर आहे तर आतांच शोधकरावयास जातों. तुह्मी कांहीं काळजी करूं नका.

सदाशिव.- माझ्या बाळाच्या शोध करून लौकर यावरें.

## पद.

( चाल - मजला बरि रुस भद्राकाय ॥ कोणि नरिसांगा हो ॥ )

माधवा इइंकीर घेऊनि या ॥ माझ्या बाळाला ॥ धृ० ॥ नेत्रीं उरला पंचप्राण ॥ जाहलीं बा पाषाणा दाण ॥ घरीं दारीं नाणा ताण ॥ मानापमान न च कोठें ॥ माधवा० ॥ १ ॥ स्नुषास गुणा दुःखिन फार ॥ आतां केंचा हो संसार ॥ त्या विण जग हें मज निःसार ॥ वारंवार बोलुं किती ॥ माधवा० ॥ २ ॥ वत्साधे

आआणाया ॥ धृ० ॥ षोडशवार्षिकवयनू-
तनहें श्यामसुंदर मम प्राणरखरा ॥ त्याविं-
णगृहिं मज चैन पडेना ॥ व्यर्थ जगामधि-
ह्मा नरखरा ॥ पाहिं नकधिंमी० ॥ १ ॥ सरिने
माजि बाहु निगेला मुकला असेल तो प्रा-
णासी ॥ जाऊनि कोठें पाहूं न याला दुःख
चि माझ्या देहासी ॥ पाहिं न कधिं मी बाल-
कनयनीं ॥ २ ॥

माधवा- श्लोक

शीघ्र आणि नो बाळका पह्रा ॥ दुःख आप-
णा जाहलें महा ॥ स्वस्थचित्त नहिं राहु यानरी
॥ धार्मिं राहणें चिंतुनी हरी ॥ १ ॥

तुह्मी कांहीं काळजी करूं नका-

सगुणा, पद.

( चाल - साध्यनसे मुनिकन्या. )

शोधोनिआणापती॥ भाउजीकरितेंचर-णींविनंती॥ धृ०॥ वैद्यव्याञ्चाडागाविलागे॥ त्याविणजीवहाश्रमिनभागे॥ करवाभे-टीतुह्मिअनुरागें॥ संकल्पपुरवास्वचें॥-भाउजीकरितेंचरणींविनंती॥ १॥

**माधवराव—** सगुणावहिनी, तुम्हीकांहींमनांत-आणूनका. माझ्याप्राणमित्रबाळायालानरमी-रववितआणणार.

**सदाशिवभट्ट—** पणमाधवराव. खरेंचकांमा-झ्याबाळ्याला पाहून. आणाल? आणाहो, विस-राल एरवांदें.

**पार्वतीबाई—** माधवराव, बाळ्याला आणाहो-आणा मलाकिं. नाहीं घटकाभर चैन पडतनाहीं,

**माधवराव—** काकू तुम्ही कांहींकाळजीकरूनका आतांचमी जाऊन त्याजलाआणतों.

पार्वतीबाई— बरें तर आणा कसें.

सगुणा— माधवराव भाउजी, अगोदर माझ्या पांढऱ्या कपाळा कडे पाहा. माझें मंगळसूत्र गेलें हो! आज पावेतों घरांत माझें बोलणं, चालणं हंसणं, बसणं, कांहींच नाहीं. तशांत माझ्या प्रारब्धानें असा प्रसंग आणिला! परमेश्वरा! कसा रे निष्ठुर जाहलास! भाउजी, तुम्हाला त्यांचा शोध कोठें तरी माझ्या प्रारब्धानें लाग-लातर घेऊन द्या (असें ह्मणून पडते.)

माधवराव— (सदाशिव भटास विचारून मार्गस्थ होतो.)

नंतर पडदा पडतो.

## प्रवेश २.

स्थळ-विचित्रपुरी.

### पात्रें.

बाळासाहेब ( बाहून आलेला गृहस्थ ) सरवारा
मपंत ( हिशेबी कारकून ) जायाजी ( शिपाई )
अनगडशाहा ( फेरी करणारा फकीर. )



(बाळा साहेब आपल्या पेटीवर बसून दुकानदा रीच्या हिरोबाची चौकशी करितात.)

**बाळासाहेब:-** (आपल्याशी) मला काकानें कांहींच कमी केलें नाहीं. लहानपणापासून मीं जेजे म्हणून हट्ट घेतले तेतें सर्व त्यांणीं मोठ्या कौतुकानें परिपूर्ण केले. त्याप्रमाणें माझ्या लग्नाचा तरी थाट कितीहर्षानें केला? सोयरीक पहावीतर श्रीमंताची. धर्मपत्नी तरजसी काय रंभाच: घरांत पाहिलें तर द्रव्य कोट्यावधी,दा- सदासी. जें पाहिजे तें अनुकूल. असी परमेश्व राची माझ्यावर दया आहे, म्हणून काकानें पेटी नें काम मला सांगितलें. (उघडपणें) बरें असो- सखाराम पंत. आतां दुकानाचा ताळेबंद लौक रतयार झाला पाहिजे. कारण दिपवाळीचें साल जवळ आलें आहे म्हणून म्हणतो.

सखाराम पंत:- (आपले दफ्तर सोडून बसतो.) (आपल्यासी) आमच्याकडून तर नाळे बंद तयार आहेत परंतु मालकास समजाऊन सांगितलें पाहिजे. बाळासाहेब, रामाजी जगन्नाथ. संगमेश्वरकर यांजपासून पांच हजार रुपयांची हुंडी आपल्या पेठीवर आली ती जमा करून. खोक्याप्रमाणें रुपये देऊन हो त्याची पावती घेतली आहे ती पहा. बाकी सर्व व्यवस्था साबक दस्तुर आहे.

बाळासाहेब:- (पावती हातांत घेऊन) हें एक बरेंच झालें. आतां अस्तमानीं काकास वर्दी देऊं ह्मणजे झालें. (असें ह्मणून नव्यासी टेकून बसतो.) जायाजी. पानाचा डबा घेऊन ये.

जायाजी. बरहाय सरकार (असे ह्मणून पानसुपारी चा डबा आणून देतो.)

बाळासाहेब- (पानसुपारी खाऊन कांहीं कागदपत्र पहात बसतो.)

(इतक्यांत अंगडशहा फकीर फेरी करितां येतो.)

अंगडशहा फकीर.

सवाल.

दान धरम कीयानही ॥ सबघट साहेबचीनानही ॥ आपआपकोंपछानानही ॥ सन्यासलियातो क्याहुवा ॥१॥ सीताचुराई-आयके ॥ आपहि लंकननाथ ॥ धनुकधरीरामजी ॥ मारे आपहि जात ॥२॥ भगवननेरा भला करे ॥ दौलत दिन बढ जाय ॥ लडके बाल राज करेंगे ॥ फकीरचलनेरस्तेसे ॥ आबाद आबाद रहो ॥ मालकनेरा भला करो ॥ आलखमे पलख पलखमे दर्याव ॥

अह्मासबीकाभलाकरे ॥

(असास ख्यालकरीतजातो.)

बाळासाहेब- (आपल्यासीं) हाफकीर नित्यआपल्या दरवाज्यावरून जातो, आणिआपले काकाहीं त्यालादररोज पैसादेत असत. त्याप्रमाणें आपणही देतजावा, जायाजी त्याफकीर बावास थोडेसें उभे रहावयास सांग. मलाकांहीं कामआहे.

जायाजी- बरेहाय? (असेंह्मणून त्यास थांबवितो.)

बाळासाहेब- (फकीराचे जवळजाऊन) महाराज, आपण जोसवाल केला त्याचाअर्थम लासमजून सांगा.

फकीर- येख्यालमे पडनानहीं. भगवतकाअजबनमासाहे, इसकामायना कछूक ध्याजाता.

नहीं. और तुम आपने पेढीपर जाके कामकाज देखा करो.

बाळासाहेब— महाराज. आपण असे करूं नये. आमच्यावर कृपा करावी हेंच मागतों. आणखी कांहीं नाहीं.

फकीर— (प्रसन्न होऊन) अच्छा. तेरा भगवन् भला करेगा. तुम हमारे मेहजीदमें चले आना फिर तुमको कुछ तमाशा दिखलायगे.

बाळासाहेब— बरें आहे महाराज, आपल्या आज्ञेप्रमाणें येतों.

फकीर— बहोत अच्छा है.

(असें म्हणून निघून जातात.)

# प्रवेश २.

स्थळ-विचित्रपुरी. फकिराचातकिया.

पात्रें.

बाळासाहेब ........ सावकाराचापुत्र.

अंनगडशहा ........ फकीर.



बाळासाहेब— ( आपल्यासीं ) आजवारगा जताम्रीपेढीवरअसतां अंगडशाहा फकीरया नेंजोसवाल केला आहे ( स्मरणकेल्यासारि खें करून ) हो, होसमजलों. अलखमेपल- ख, पलखमोहर्योव. याचाअर्थ विचारून घेण्याकारतां बुवाचे तकियांतजावयाचें आहे तरआतां सर्व कामें सरकारामपंत यांजकडे- सोंपवून मी मेहजीदीकडे जातों ( असे म्हणू नतिकडेजातो. )

इतक्यांत अंगडशाहाफकीरगावांतफेरा- करूनआपल्या तक्यांत येऊन निमाजपढ- तो. )

अंगडशाहा— ( पश्चिमे कडे तोंड करून ) आल्ला, बिसमिल्ला, रहिमान. मालिकसबदु नियाके पैदा करने वाले परवरदिगारसभा

नआह्मा ( असेंह्मणून उठबशा करितो ( इतक्यांत बाळा साहेब प्रवेश करितो. )

बाळासाहेब- ( अंगडशहास पाहून ) साईमहाराज. मी आपल्या दर्शनास आलों- आहें, तर कृपा करून " अलखमेपलख. पलखमेदरयाव"; याचा अर्थ सांगा. मला- फारच लंठा लागली आहे. साईमहाराज, माझ्याकडे पहा. ( असें बोलत असतां फकीर आपल्या झाडास पाणी घालण्या च्या नादांत निमग्न आहे तो त्याजकडे पहात नाहीं )

( आपल्यासीं ) आतां करावें तरी काय? या निंबाऱ्याझाडाखालीं सुंदर संगमरवरी पाषाणाचा चौत्रा आहे त्याच्यावर जाऊन बसतों. ( असें ह्मणून तसें करितो. ) करावें तरी काय? पहा या दोन प्रहर च्या समयास उ-

घ्यातरी किती होतो? यासी नकळायेंत -
गार चौऱ्यावर थोडी वामकुक्षी करितों (अ
से म्हणून तसें करता नां त्यास स्वप्न पडतें का
यचमत्कार सांगावा? माझे आई, बाप द्रवी
ड देशांत आहेत. तसीच माझी सुंदर कांता-
नवयौवन संपन्न गृहीं असून अहो पहा नुक
तेंच गर्भाधान झालें. असे असतां मी त्या गां
वातल्या उनाड पोरां बरोबर संगमावर पोहा
वयास गेलों आणि तेथें भोवऱ्यांत सांपडून
वहात वहात इकडे आलों. आणि मला का
कानें धरून घरीं आणिलें. व आजपर्यंत-
माझें पालन पोषण करून मोठ्या समारंभा
नें थाट केला. लग्न झाल्यास तरी बरेच दि-
वस झालें, बायको तरी किती मन धरणीची
मिळाली आहे! वा हवा एकूण माझ्यासारि-

त्याभाग्यवान् दुसरा प्राणी आजगतीतला-
वर कोणीचनसेल! ( असें स्वप्नपुरें होतांच
जागाहोऊन पहातो तों फकीर मसीदींतआ
पल्याझाडाचीरवटपट करीतआहे असें पहा
तो. ) कायचमत्कार सांगावा! मीयादगडाव
र निजलोंकाय? आणिस्वप्नरीपडलें काय?
बहुनकरून स्वप्नखरेंच असेल. आतांआप
णाआपल्या पेटीवरजाऊनकामकाजपहात
बसावें म्हणजेझालें. ( असें म्हणून निघून
जातो. ( इतक्यांत माधवराव शोधकरीतक
रीत त्याच्यापेटीवरयेतो. )
माधवराव- ( आपल्यासी ) कायचमत्का
र सांगावा! बाबालाविचारून जोमीनिघा-
लों त्यास आजवरे चदिवसझाले. बाळ्या-
चाशोध म्हणून मला कोठें लागतनाहीं. अहो

बाळ्या गेला तर जाऊंद्या. पण माझे अगोदर-चार लाल मिळाले पाहिजे नना? याचा काय विचार? आतां ह्या विचित्रपुरींत येऊन दाखल झालो आहें. तरी या मोठ्या बाजारांत सावकाराच्या ओळींत बारीक दृष्टीनें पाहिलें पाहिजे-म्हणजे प्रारब्धयोगानें जर बाळ्या भेटला तर भेटेल। ( असें म्हणून त्या पेटीवर येतो. तेथें बाळासाहेबास पाहून ) वाहवा! काय आजहास्कदीन! माझ्या मित्राचा लाभ आज मला जहाला! ( असें म्हणून जवळ जाऊन ) नमस्कार बाळासाहेब! आपण खुशाल आहांतनां?

बाळासाहेब — ( नीट आपल्या बाळमित्रास पाहून ) नमस्कार माधवराव, कां बरे आहांतनां.?

माधव० — आम्ही तर बरेंच अहों, पण ( असें

म्हणून डोळ्यांस पाणी आणतो. )

बाळासाहेब— कां माधवराव, असें आपण कां बरें करितां ? आपल्यास कांहीं दुःख झालें काय ? सांगा सांगा, परमेश्वर कृपें करून जें पाहिजे तें देईन. पण अगोदर समजलें पाहिजे.

माधवराव— ( आतां यास सांगितलें पाहिजे. असा आपल्याशीं विचार करून ) बाळासाहेब, मी तुमचा बाळमित्र आहें हें तुम्ही जाणतां काय ?

बाळासाहेब— ( हंसून ) माधवराव, आपण असें कसें म्हणतां ? अहो, लहानपणापासून एके ठिकाणीं वाढलों, नशील तुमचा आमचा घरोबा तरी कसा आहे हें कां तुम्हांस माहित नाहीं ?

माधवराव— सर्व माहीत आहे म्हणूनच आ-

पणास विचारतों कीं, आपण शरीरप्रकृती-नें खुशाल आहांतना ?

बाळासाहेब— शरीर प्रकृतीनें खुशाल-आहें कांहीं काळजी नाहीं, तुह्मीं सर्व मुलें माणसें स्वरक्षीन आहेतना ?

माधवराव— सर्व स्वरक्षीन परमेश्वराच्या-कृपेंकरून आहेत. कांहीं काळजी नाहीं. परंतु—

बाळासाहेब— कांहो माधवराव, परंतु काय ? याचा अर्थ कांहीं समजला नाहीं, तर तो कृपा करून सांगा, ह्मणजे मनाचें समाधान होईल. नाहींतर मला कांहींच चैन पडणार नाहीं हें तुम्हांस मी पक्केपणीं सांगतों.

माधवराव— सांगतों तर आतां. आपले घरीं वृद्ध मातोश्री वडील आहेत. त्यांस आपलें दुःख झालें असें मात्र करूनका.

बाळासाहेब:- अहो माधवराव, येथें माझे-
काका आहेत, आई आहे. तशीच सुंदर मनो-
रम बायको पण आहे; आणखी कांहीं कमी का-
आहे? शिवाय कोट्यानधि रुपयांची मालमत्ता.

माधवराव:- बाळासाहेब, आपण नीट स्मृती
वर येऊन स्मरण करा. सदाशिवभट्ट बाबा आ-
णि पार्वतीबाई काकू आणि तसीच सगुणाही तु-
मची कोण आहेत याचा विचार करा.

बाळासाहेब:- होहो; तें सर्व आतां मी समज-
लों. तें उभयतांच हू माझे मातापितर - आणि ती-
तर आमची लग्नाची बायको, हें सर्व खरें असून
येथेंही थाट तसाच आहे. बाबा आहेत, आई -
आहे, बायको आहे; तेव्हां खरें कोणचें आणि
खोटें कोणचें, परमेश्वराचें परमेश्वर जाणे. खरें
कांहींच समजत नाहीं. (इतक्यांत त्यास अंगड

ह्याच्या सवालाचें स्मरण होतें. ) "अलखमे पलख. पलखमे दर्याव" म्हणतात, तर कांहींवि न्ह नसेलना? असो. माधवराव, मग पुढें का यहकीगत?

माधवराव— अहो बाळासाहेब, तुम्ही संगमावर पोहण्याकरितां मुलांबरोबर गेला. हें ताना तेथें वाहून गेलां म्हणून उभयतांस दुःख झालें. तुमची बायको तर नक्षत्रासारखी आहे. तुमच्याकरितां फार चक्करणीस लागली आहे. करितां आपण एकवार त्यांची भेट घ्यावी हें च म्हणतों. म्हणजे, त्यांचे मनाचें समाधान होईल.

बाळासाहेब— (आपल्यासी) हें तर मोठें लिगाडच व्हावयास पहातें. असो. जें प्रारब्धीं असेल तें होईल.

माधवराव— त्याच प्रमाणें माझे चार लाल-
तुझ्याजवळ ठेवावयास दिले. ते देण्याविष-
यी बाबांस पत्र तुमच्या खुशालीं साहे न देह्ल-
णाजे मी आपल्या देशांत जातो. कारण माणा-
सें वाट पहात असतील. म्हणून करा तयारी-

बाळासाहेब— माधवराव. बाबांस पत्र तुमचे
लाल देण्याविषयीं आणि माझ्या खुशालीस-
हि न देतों म्हणजे झालें ना ? ( असें म्हणून-
तर सांगितल्या प्रमाणें पत्र लिहून देतो. ) पण-
आपल्या पंक्तीचा लाभ न रझालाच पाहिजे.

माधवराव— जर आपली. इच्छा आहे तर मी-
कां नको म्हणतो. ( असें म्हणून त्यांचे वाड्यां-
त जातो. तेथील सर्व थाट पाहून विस्मित होतो,
आतां मेजवानीचा थाट बराच झाला : पत्र घे
ऊन आपला जातो ( असें म्हणून नमस्कार

करून निघून जातो. )

बाळासाहेब— माधवराव तरगेले. परंतु मला मोठें संकट पडलें आहे. दोहीं कडे ध्यात- सारखाच आणि मी पडलों एकटा. तेव्हां काय होईल तें होवो! असो. आतां मी पेटीवरहुंड्यां चा हिशेब करण्याकरितां जातों. ( असें म्हणून निघून जातो. )

---

## प्रवेश ४.

स्थळ. सदाशीवभटाचें घर.

पात्रें— सदाशिवभट्ट ( गरीब ब्राह्मण ) पार्वती- बाई ( यांचें कुटुंब ) सगुणाबाई ( बाळ्याचीना- यकी ) माधवराव ( बाळ्याचा स्नेही— )



सदाशिवभट्ट - (बाळ्याचें स्मरण करून) अरे बाळ्या! कसारे माझा घात केलास? आणि वृद्धपणीं आमचा परित्याग करून दीनावस्थेस आणिलेंस. (असें म्हणून रडूं लागतो.)

पार्वतीबाई— अहो. माझानवा नवसाचासु लगा कसाहो पाण्यांत वाहूनगेला ? आतां त्या लापहावें तरिं कुठें ? यासगुणेस पाहिलें म्हण- जे माझें काळीज तरदुभंग होतें ! बाळ्या. आ- तां तुला पाहु नरि कोठें ( असें म्हणून रूदन- करिते. )

सगुणाबाई— आहारे प्रारब्धा ! प्रातः का- ळीं माझें सुख रूपडा कोणीपहात नाहीं. किंवा- माझाशकूनही कोणी घेत नाहीं ! देवा ! मला- कसारे मृत्यु त्यांचे अगोदर आला नाहीं ( अ- सें म्हणून आपलें कपाळ आपटून घेते. )

सदाशिवभट्ट— अहो. कायचमत्कार सांगा वा०. बाळ्याचाशोध करावा म्हणून माधवरा वास आजवरे चदिवस झालें पाठविलें परंतु- तोर्ठा काक जो न्हागलो आहे. आमचे सर्वडोळे

त्याचेकडे लागले आहेत. बहुनकरूनतो-येण्यांतनच आहे. पहावें काय श्रीहरीकरीलतें. खरें.

पार्वतीबाई— ऐकिलेंनकाय? आजमला-किनीबाई अपशकून होतो. बहूनकरूनबा-ळाचा शोध लागेल असा अजमास आहे. का-य अंबाबाई करीलतें खरें. मीनवस केला-आहे. माझ्या बाळ्या मला भेटला म्हणजे वो-हरानें दर्शनास आणीन, ब्राह्मणभोजन घा-लीन.

सगुणा— सासूबाई, आज माझा डावा डोळा लवतो, डावी बाही फुरफुरते, हजारहिश्शानें म-ला माता पूरची आई पावेल. आणि त्यांचा शो-धलागणारच आहे. ( इतक्यांत माधव-राव प्रसन्नचित्तानें प्रवेश करितो. )

माधवराव— ( संतोषानें ) नमस्कार बाबा!

सदाशिवभट्ट— ( न्याहाळून पाहून ) कोण मा धवराव! आलांत? कोठें बाळ्या कोठें आहे! अगोदर सांगा पाहूं म्हणजे मजाचें समाधान होईल.

श्लोक.

हावा मला बाळ्कृगा जिराहो॥ वंशासि जो मंडणासा जिराहो॥ प्रेमें सुरेंद्र निरखो नि- ठोका॥ बाल्या विणें हो मम जीव शोका॥ १॥

इंद्रसभा.

कथन करा आधीं मला कुमर कोठें जाण॥ आ हे पंच प्राण भला॥ करिन मी सन्मान॥ १॥

माधवराव— बाबा, तुह्मी कांहीं काळजी करूं नका.

पद.

( ऐकुनि विपरीत वाणी द्रौपदी दचकली मनीं )

निजनिज नगरी मधि मला॥ बाळासाहेब देखि

ला॥ साक्षुकार जाहला॥ सकळ विसर-
ल्या जना॥ चाल०॥ हरिकुपेनित॥ मामस-
नत सहस्त्रों भला॥ घडे सौख्य मासला॥
चिंत्ति०॥ १॥

पार्वतीबाई— ( माज घरांतून येऊन न्हाणानें )
काय माधवराव आणिला काय बाळ्या ?

पद.

( न्हान तुम्ही व्हावें व्हावें महाराजा. )
प्राणपति ह्या कामारि व्हाया. )

कुठे आहे सबाळा॥ बाळा सकरवराशी॥ दा-
रवना आणुनियां मजशी॥ धृ०॥ नेत्र आज
माझे माझे बहु सारू॥ रडतां झालेपक्षा हाल
॥ करूं कसें आतां॥ आतां संसारीं॥ धावे पावे
केसारी॥ दारवबाळा॥ बाळा सकरवराशी
॥ दारववा आणुनिया मजसी॥ १॥

साकी.

नकराचिंतामानसिकाकू काकूकेशीकरि तां॥श्रीहरिवरदेभेटेलसत्वर॥ सोसनध रावाभलता॥आणिलेंक्लिशिवनसीत्याचें ॥ कराश्रवणमृदुसाचें ॥ १ ॥

सगु० = अंजनीगीत.

दावामजलाप्राणनाथा॥ वाहुनिगेलेजेस रितेंन॥शोधकरायाआपणत्वरित॥गेला भाऊजी॥ १॥ सांगाकोठेआहेननरिने॥सो भाग्याचेंपोतेंचरिनें॥ जाहलें त्याविणस र्वद्रुरिलें॥ केशीगांजनिगा॥ २ ॥

सगुणाबाई— तुमची आणिबाळासाहेबाची भेटलवकरचहोईलबरें.काळजीकरूनका.

पार्वतीबाई— माझाबाळ्याकोठेंआहेतोसांगा.

माधवराव— बाबा,काकू.तुमचाबाळ्याआ-

हे. मी त्यास पाहून आलों. आणि त्याचे हातचें पत्रही आणिलें आहे.

**सदाशिवभट्ट**— माझा बाळ्या आहे ना? सांगा कोठें आहे तो, आणि तें पत्र अगोदर द्या.

**माधवराव**— बाबा, मी सर्व देशांत बाळ्याचा शोध करीत चाललों तो विचित्रपुरींत एकासावकाराच्या पेढीवर हुंड्या पाड्याचा व्यापार करीत बसला होता. काय त्याचा थाट? दहा पांच कारकून, शिपाई, प्यादे, लोकांची तरी गर्दी काय? नशांत जवळ जाऊन त्याला इकडील सर्व मजकूर सांगून त्याचे हातचें आपल्यास पत्र आणिलें आहे. हें पहा. (असें ह्मणून पत्र त्याचें स्वाधीन करितो.)

**सदाशिवभट्ट**— (पत्र हातांत घेऊन वाचतो.)

तीर्थरूप राजमान्य राजश्री बाबासाहेब-

सुज्ञा भिन्नता पाडुं वडिलांचे सेवेशी-
बालके बाळानें करद्वय जोडून शिरसाष्टांग-
नमस्कार. विज्ञापना तागाईत श्रावणशुद्ध ५
पावेतों वडिलांचे आशीर्वादें करून सुखरूप वि
चित्रपुरी येथें स्वस्थान असो विशेष. यानंतर
इकडील मजकूर. मी आपल्याजवळ असतां-
ना गांवांतील मुलांबरोबर संगमावर पोहाव
यास गेलों आणि तेथें एका भोंवऱ्यांत सांपडून
वहात वहात या विचित्रपुरींत येऊन नदीच्या
कडास लागलों. येथें काकासाहेब म्हणून को
त्यावधि रुपयांचे सावकार असून, त्यांस पुत्र
संतान नसल्याकारणानें मला त्यांनीं धर्मपु
त्र समजून आपल्यामागें सत्तामालक करून
ठेविलें त्याप्रमाणें सर्व कामकाज मी स्वतः पा
हतों. त्यांनीं माझें लग्न तरी मोठ्या थाटानें के

लें. सर्व गोष्टी मला अनुकूल आहेत; परंतु-आपली भेट मंडळीस कळूं नाहीं ह्मणून फार चट्टुःख वाटतें! माधवराव भेटले. सर्व मजकूर समजला. त्यांचें चार लाल आहेत ते मी फलंगाच्या चार खुरांत ठेविले आहेत ते पाहून-त्यांचे त्यांस द्यावे. कळावें. सेवेशी श्रुत होय ही विज्ञापना.

पार्वतीबाई— ( आपल्या कामाकाजांत निमग्न असल्यानें पत्र काय वाचिलें तें ध्यानांत आलें नाहीं ह्मणून ) माधवराव, माझ्या बाळ्याचा समाचार आणला काय?

माधवराव— काकू, बाळा खुशाल आहे त्याचें पत्र आणून बाबांस दिलें आणि त्यांनीं तें वाचून पाहिलें.

पार्वतीबाई— मला तर कांहीं समजलें नाहीं-

नरअतां असें करून का. अगोदर त्याच्याचें पत्र तुह्मी वाचून दाखवा ह्मणजे झालें.

माधवराव – काकू, जर तुमची अशी मर्जी असे ल तर नसें का होईना. माझें तरी काय जातें, (अ सें म्हणून बाबाजवळून पत्र घेऊन वाचून दाखवितो.)

साकी.

तीर्थरूप मम सौख्य निशापति बाबासाहेब यांतें॥ बालक वंदी भावें बाळा आणु निर्मनि प्रेमानें॥ परिसा माझ्या वृत्ताला॥ कथिल माधव आपणाला॥ १॥

पद.

(वसंतिं बघुन मेनिकेला॥ गाधिजमुनीनें स्कन.)

सरितेमाजीं वाहुनि गेलों॥ पोहतां पोहतां भान सकल मी मनिचें विसरलों॥ पुढती म

गाराफीकडेआलों॥ काकानेंमजआणु-
निसदनींपाहुनिगृहरमलों॥काकुनेंपाळु-
निमजलागीमायाममता॥विशेषकरितां-
त्यालाभीफळलों॥चाल॥ मालकमजके
लेंसाचार॥बसविलेंधनमयराशीवर॥पे
टीचा दिधलाकारभार॥चाल॥केलेंपुढें-
लग्नपैंमाझें॥ तरुणीकांताप्राहुनिसदनीं-
वदनाब्जींरमलों॥ सरितेमा०॥ २॥

दिंडी.

लाल द्यावेमाधवालागिचार॥पलंगाचेपा-
यांनसौख्यसार॥भेटहोईलनेंस्फ दिनसा
चजाण॥ बालकाचेंहे बोलमनीं आणा
॥१॥

( असेंपत्रवाचून दाखवितांच सर्वांसआनंद-
होतो. )

माधवराव- आबा, अगोदर माझे लाल मला द्या.

सदाशि०- माधवराव, हे आपले चार लाल घ्या. (असें म्हणून त्याचे त्यास लाल देतो.)

पार्वतीबाई- आतां माझा बाहुल्या कोठें आहे तो मला दाखवा. म्हणजे मनाचें समाधान होईल.

सदाशिव०- चला. आपण सर्व मुलींसुद्धां तिकडे जाऊन त्यांची अगोदर भेट घेऊं.

माधवराव- बरें आहे. चला तर (असें म्हणून सर्वांस घेऊन विचित्रपुरीस जातो.)

प्रवेश ५.

स्थल.

विचित्रपुरी.

# पात्रें.

काका साहेब ........ कोर्टाधीश सावकार.
बाळासाहेब ............ धर्मपुत्र.
रमाबाई काकू ...... बाळासाहेबाची आई.
गोपिकाबाई ...... बाळासाहेबाची बायको.
सदाशिवभट्ट ....... बाळ्याचा बाप.
पार्वतीबाई ........ बाळ्याची आई.
सगुणाबाई ........ बाळ्याची बायको.
माधवराव .......... बाळ्याचा स्नेही.



सदाशिवभट्ट- कां माधवराव, आतां विचित्रपु रीकिती लांब आहे. १

माधवराव- काकाही पहा अर्ध कोशावर आली आहे. आतां सर्व आपण अगोदर जाऊन राका. धर्मशाळेंत जावून राहूं आणि मग काय तो वि. चार.

सदाशिवभट्ट- बरेंतर, नसें कां होईना. (अ. सें ह्मणून सर्व जाऊन विचित्रपुरीच्या धर्मशाळे त जातात.)

माधवराव- (आपल्याशीं) आतां अगोदर जाऊन बाळासाहेबास. वरदी देऊन त्यांजला इकडे आणिलें पाहिजे. (उघड) बरें चला. (असें ह्मणून बाळासाहेबांच्या पेढीवर जातो)

माधवराव- (जवळ जाऊन, नमस्कार. बाळासाहेब, आपले बाबा धर्मशाळेंत आ-

पल्यास भेटावयास आले आहेत. अगोदर तिक-
डे चला.

**बाळासाहेब**- ( मोठ्या संतोषानें ) नमस्का
र माधवराव. बाबा का आले आहेत? तर चला.
( असें ह्मणून उभयतां धर्मशाळेंत येतात. )

**सदाशिवभट्ट**- ( बाळासाहेबांस पाहून मो-
ठ्या हर्षानें ) अरे बाळ्या, ( असें ह्मणून. आ-
पल्या पोटाशीं धरितो. ) आतां बरें झालें. खुशा
ल आहेस ना? फार दिवस झाले आह्मी दुःख-
सागरांत निमग्न झालों!

**पार्वतीबाई**- ( आनंदानें ) अरे बाळ्या-
कोठें गेला होतास? बाबारे, आतां आमच्या-
प्राणांत प्राण आहे ( असें ह्मणून त्याच्या तोंडाव
रून हात फिरवून पोटाशीं धरिते. )

**बाळासाहेब**- बाबा, आई, ( दैवोगिचि-

भागनिः" ब्राह्मणीप्रमाणें सर्व घडून आलें; त्यास माझा कांहीं उपाय नाहीं. आपल्यापाया-च्यापुण्यानें हा योग घडून आला, आणखी कांहीं नाहीं.

सगुणाबाई.— ( हा सर्व प्रकार चोरून ए-क्या बाजूस उभी राहून पाहते आणि लोकरजा ऊन बाळा साहेबांचे गळ्यांत मिठी घालते ) म-हाराज, आज माझ्या मणि मंगल सूत्राचा उद्-य काळ आला, असें म्हणा वयास कांहीं हरक त आहे असें नाहीं. आपणागे त्यापासून या स-गुणेचा सौभाग्य चंद्रमा अस्ताचळास गेला-होता. त्यायोगानें विरह अंधः कारांत मी बुडू न गेलें होतें; परंतु माझ्या प्रारब्धानें पुनः उद यास आला. आतां बरें झालें ( असें म्हणून ए कसारखेच्या + देते. )

( असा जो प्रेमानंद होत आहे तो काकासाहेब, रमाकाकू आणि गोपिकाबाई अशा येऊन परस्पर भांडतात. )

**सदाशिवभट्ट**— ( बाळ्यास ओढून ) माझा बाळ्या.

**काकासाहेब**— अहो हें काय लिगाड ! हा माझा बाळ्या असून, त्याच्यावर मालकी तरी हा ह्या तारड्या कशाकरितां करतो ! ( असें ह्मणून बाळासाहेबांस आपल्याकडे ओढून घेतो )

**पार्वतीबाई**— वाहवा, तुमचे सर्व राहूं द्या: या बाळ्यास मी नऊ महिने किं हो पोटांत वागविलें, आणि नाळ्ली आपली माझ्या बाळाला ( ? ) बाका ह्मणायाला !

**रमाकाकू**— बाळासाहेब माझा, लहानपणापासून पालनपोषण करून शेवटीं आली

बापडी त्याचाला! माझ्या बाळासाहेब नाहींमी देणार.

सगुणाबाई:- सासूबाई, तुमचे कांहींच नाहीं. मीचारजणांसमक्ष लग्न लाविलें आहे मी-तर बोलून देणारच नाहीं. माझे यजमान:

( असें म्हणून त्यास आपल्याकडे ओ-ढिते. )

गोपिकाबाई:- वाह वागे, कानापाठीमागून आली. आणि निरवट झाली. माझा नवरा मी-नाहीं देणार ( असें म्हणून बाळासाहेबास. आपल्याकडे ओढून घेते. )

बाळासाहेब:- आतां काय म्हणून माझ्याना

ण रहात नाहीं! मांजराचा होतो खेळ आणि-उंदराचा जातो जीव, याप्रमाणें झालें आहे. करावें तरी काय?

( असें जौपर स्पर्शांचे भांडण चाललें आहे तो अंगड शाहा फकीर येतो. )

अंगडशाहा- ( असा तंटा पाहून सवाल करितो. )

## सवाल.

अजब नक्षा करनार की ॥ बिन खंब से ग गन ॥ चांद सूरज तारा सबी ॥ हो रहे आ पमगन ॥ १ ॥ आलख मे पल ख पल खत- मे दरयाव ॥ अजब मालक की करत ब- है या इलाही कुरान अच्छा :

( असा सवाल करून जबाब येऊन विचार तो. )

अंगडशाहा- क्या बाबू. तुमारा क्यान मा साहे ? और आपसमे क्यों लडने ? इसका का- रज कच्छु मालुम नहि होता. सो बयान करो.

अल्ला सबका भला करेगा.

**सदाशिवभट्ट** — साई. येलडका हमाराहा. य. उसकीयेमा. और औरतरवर्डा है. देखलेना. ये कहांसे आये और कहते मेराबाल्या, मेराबा त्या. आब मैं क्या करूं?

**अंगडशाहा** — (यहि तुम्हारी हकीकत है.) (काकासाहेबाकडे वळून) क्योंजी तुम क्या ल टते हो?

**काकासाहेब** — सांई, हा बाळासाहेब माझा पुत्र आहे. मी लाखो रुपये खर्च करून याचें. लग्न केलें. आणि सर्व प्रकारें पेढीचा मालक केला. ही पहा याची आई. ती पहा कोपऱ्यांत लाजून उभी राहिलेली याची बायको. असें असतां हे कोणी कडून भिकार आलें आणि म्हणतात कीं. माझा बाळासाहेब. नेह्यांमी करावें.

तरी काय ? याचा न्याय आपणच करावा.

अंगडशाहा:- ( क्या अचंबा है! एक मरद कोदोन औरता. तो आप आपनें मतलबके वास्ते झगडा करते हय और कछु नहि. ) अछा बाबू तुम सब मिलके हमारे तकियामें चलो. फेर सब खुदा न्याव करेगा. आबदेर मत करो.

( असें फकिराचें भाषण ऐकून सर्वजण मशिदींत येतात. )

अंगडशाहा:- अब ऐसा करना चाहिये.

( असें ह्मणून. बाळासाहेबास संगमर वरी दगडाच्या चौथ्यावर निजवून त्यांचे अंगावर शेला टाकितो आणि त्यांही दोघींस ह्मणतो कीं, तुम्हीं आपले नवरे ओळखून घ्या. )

दोन्हीबायका:- ( चौथ्या जवळ जाऊन अंगावरचा शेला काढितात तो दोन बाळासाहे-

बझाले. नंतर दोघींनी दोन घेऊन. समाधान-मानिलें. )

सगुणाबाई:- ( आपल्याशीं. ) माझायजमान नर मला मिळाला. आनां मी पाहिजेतितकें सौख्य भोगीन ( असें ह्मणून त्यास घेऊन सासू सासऱ्यांसह आपल्या घरीं जातें )

गोपिकाबाई:- ( आपल्याशीं ) माझ्यासवतीशीं भांडतां भांडतां जीव थकला; पण या फकीरबावानें मांझ्यावर कृपा केली. आणि-माझे पति मला मिळाले ह्मणूनच बरें झालें

( असें म्हणून त्यास घेऊन. आपल्यासासऱ्यांसह घरीं जातें. )

# भरतवाक्य.

## पद.

(चाल० सुंदरमुरवतुं दिलननु नंदिकेश्वरा.)

होवोसुखसकलाते याजगीमहा॥ दिव
सरजनिंअलखपलखसिंधुहापहा॥ -
धृ०॥ त्रिचनापल्लि विप्रएकराहिला॥
नामसदाशीवतयापुत्रजाहला॥सरिते
मधिंवाहुनितटिंशीघ्रलागला॥ त्याते -
नाहीं, काहीं, स्मरणचते, कामिनभतें,
मनरमतें. विभवभारहा॥ दिवस०॥१॥
चित्रपुरीं माजिसाहुकारएकसे॥ धर्म-
कुमरमानिनयाहर्षलेतसे॥ कांताग्रह-
दासदासिबधुनिफलनसे॥ रमला,
भमला, कमला, निरखुनियांहृदयि-

द्या, धरिसमयाबोलिली अहा ॥ दिव स० ॥ २ ॥

अंगडशाहा :- बाबू आप आपना बालासाहे-ब घरमे लेकर जाव और आनंदसे राज करो.

सर्व :- नहो न आच्छा साई.

( असें ह्मणून सर्व निघून जातात. )

मराठी ग्रंथ संग्रहालय ... नं. ... ता. ...



